आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI NO. MAHBIL/2011/39044

वर्ष १४ | अंक ३ | जून २०२५ | मूल्य ₹५/-

# Grahak Tituka Melwawa
# ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत

ग्राहक हिताय ग्राहक सुखाय

मुंबई ग्राहक पंचायत MGP50 सुवर्ण महोत्सवी वर्ष २०२४-२०२५

MEMBER OF CONSUMERS INTERNATIONAL

जागो ग्राहक जागो

## ५ जून जागतिक पर्यावरण दिवस



## मुंबई ग्राहक पंचायतीचा पॉडकास्ट 'ग्राहक गप्पा'

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर बुधवार, ३० एप्रिल रोजी आपल्या स्वतःच्या **MGP Podcast 'ग्राहक गप्पा'**चे पहिले प्रसारण झाले. ३० मिनिटांच्या पहिल्या एपिसोडमधे शर्मिला रानडे यांनी कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे यांच्याशी 'बँकांतील ठेवींची सुरक्षा' यावर गप्पा मारल्या. **आता हा Podcast दर रविवारी सकाळी ११ वा. प्रसारीत करण्याचे ठरले आहे.**

दुसऱ्या व तिसऱ्या भागात शिरीष देशपांडे यांनी रेरा कायदा महाराष्ट्राला कसा लागू झाला, त्यातील मुंबई ग्राहक पंचायतीचे योगदान हे रंजकपणे शर्मिला रानडे यांच्याशी गप्पा मारत सांगितले. आत्तापर्यंत झालेल्या सर्व एपिसोड्सचे चित्रीकरण ग्राहक भवन येथे आपल्या चेंबूर विभागातील कार्यकर्त्या जान्हवी नाडकर्णी, विनीता बेडेकर व त्यांचा मुलगा आशीर्वाद बेडेकर यांनी केले आहे.

Mumbai Grahak Panchayat



**QR Code स्कॅन करून मुंबई ग्राहक पंचायतीचा युट्यूब चॅनेल बघा, सबस्क्राइब करा, लाईक/ शेअर करा, ही विनंती.**

## फुगविलेल्या MRP

आपल्या संस्थेने सुचवल्यानुसार शुक्रवार, १६ मे रोजी केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयातर्फे, फुगविलेल्या MRP किंमतींबाबत ग्राहक संस्था, FICCI, CII, ASSOCHAM आणि GST अधिकारी यांचे एक ऑनलाईन चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रात शिरीष देशपांडे यांनी फुगविलेल्या MRP आणि त्यावर आधारित फसवे discounts याची काही उदाहरणे देऊन सध्याची MRP ही पध्दत ग्राहकांचे संरक्षण करू शकत नसल्याचे दाखवून दिले. आणि GST ही transaction based आकारणी असल्याने या सर्व बदलेल्या परिस्थितीचा विचार करून ग्राहकांची फसवणूक आणि लुबाडणूक थांबवण्यासाठी काय करता येईल, यासाठी सर्व संबंधितांना घेऊन एक अभ्यास समिती स्थापन करावी अशी सूचना केली आहे. ग्राहक सचिव निधी खरे यांनी आपल्या सूचनेचे जाहीर स्वागत केले आहे. शर्मिला रानडे सुध्दा या सभेला हजर होत्या.

## महारेरा विशेष सलोखा मंचावर ॲड. शिरीष देशपांडे आणि डॉ. निरंजन हिरानंदानी यांची नेमणूक

गेली चार वर्षांहून अधिक काळ ठप्प असलेल्या तळोजा (पनवेल) येथील १२ टॉवर्स आणि १७०० सदनिका असलेल्या सुप्रीम कन्स्ट्रक्शन डेव्हलपर्सच्या गृहप्रकल्पात सलोख्याने मार्ग काढून ग्राहकांना घरे मिळवून देण्यासाठी योग्य ती उपाययोजना सुचवण्यासाठी महारेराने कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे आणि डॉ. निरंजन हिरानंदानी यांची विशेष कंसिलिएटर्स म्हणून नेमणूक केली आहे.

RNI No. MAHBIL/2011/39044

**मुंबई ग्राहक पंचायत**

**विश्वस्त मंडळ**
डॉ. बाळ फोंडके
अनुराधा गोरे
ललिता कुलकर्णी
अनुराधा नरसाळे
संजीव मंत्री

**अध्यक्ष**
डॉ. बाळ फोंडके

**उपाध्यक्ष**
अनुराधा गोरे

**कार्यकारी मंडळ**
ॲड. शिरीष देशपांडे (कार्याध्यक्ष, स्वीकृत)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह, स्वीकृत)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

**कार्यकारिणी सभासद**
ज्योती मोडक
शीला देवळेकर
राजेंद्र राणे
शुभदा चौकर
अनघा आचरेकर
मंगला गाडगीळ
शर्मिला रानडे
आलोक हर्डीकर
विवेक केळकर
प्रकाश पाटील
उदय पिंगळे (स्वीकृत)
नेहा जोशी
कल्पिता रानडे
विनायक सोमण (स्वीकृत)
सुधीर तावरे

**निमंत्रित**
संघटन विभाग प्रमुख

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक/संघटना सहमत असतीलच असे नाही.

# ग्राहक तितुका मेळवावा

जून २०२५ | ज्येष्ठ - आषाढ १९४७

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **संपादकीय**<br>प्लास्टिक प्रदूषण- माझा वाटा किती? | ०४ |
| **यंदा मातीची किंवा कायमची मूर्ती घ्याल?** | ०५ |
| **ग्राहक न्यायालयांची फेररचना करा** | ०६ |
| **तक्रारींसाठी आरटीओचा एकच हेल्पलाइन क्रमांक** | ०७ |
| **गोरेगाव ग्राहक पेठेत संस्थेचा ५० वा वाढदिवसही!** | ०८ |
| **‘बँकिंग’बद्दल बोलूया**<br>वारस नोंदणी आणि मृत्युपत्र | ०९ |
| **वाचू आनंदे**<br>आपले वर्तन आपला मेंदू | १२ |
| **वार्षिक मेळावे उत्साहात संपन्न** | १३ |
| **ठाणे विभाग संघप्रमुख स्नेहमेळावा** | १८ |
| **सिटी कोऑप बँक ठेवीदारांचा लढा** | १९ |
| Notice to Uber for ‘Tip’ | २० |
| Stop Corrupt Involvement of Registrars in Re-development Process | २१ |
| 5 Delhi Restaurants Ordered To Refund Unlawful Service Charges Collected from Customers | २२ |

**संपादक** शुभदा चौकर
**संपादकीय साहाय्य** नेहा जोशी
**सल्लागार** ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
**मुखपृष्ठ** राजेंद्र राणे
**अक्षरजुळणी व कला दिग्दर्शन** रिद्धी नि. पाटील, तन्वी गोखले
**मुद्रण** इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

Printed & Published by **NISHIKANT VINAYAK GURJAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat**, Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai – 400 056. Ph.: 022-4750 8541/42 (Office).
• Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in
• Website : **https//www.mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

संपादकीय

# प्लास्टिक प्रदूषण- माझा वाटा किती?



**पृथ्वीचे निसर्गातील सफाई कामगार म्हणजे सूक्ष्मजीव, तेही आता प्लास्टिकचे विघटन करायला सरसावले आहेत... आपण काय करत आहोत?**

गेल्या वर्षभरात म्हणे जगभरात अंदाजे ४ अब्ज टन प्लास्टिक कचरा निर्माण झाला, असे 'युनायटेड नेशन्स'ने त्यांच्या अहवालात म्हटले आहे. आपलाही वाटा आहे त्यात? प्रत्येकाने स्वत:ला विचारून स्वत:चे ऑडीट करावे, असा प्रश्न आहे हा. मान्य आहे की प्लास्टिक कचरा निर्मितीत भारताचे प्रमाण अमेरिकेच्या एक दशांश असेल, युरोपच्या एक पंचमांश असेल, कारण अजून आपण त्यांच्याइतके प्लास्टिक आवेष्टित अन्न/वस्तू वापरत नाही. तरीही आपल्याकडील लोकसंख्या व प्लास्टिक कचऱ्याच्या पुनर्चक्रीकरणाच्या अपुऱ्या सोयी बघता आपण प्रगत देशांशी तुलना करण्यापेक्षा आपला कचरा आपण आवरावा, हे बरे!

प्लास्टिक विघटनावर जगभरात संशोधन सुरू आहे. संशोधकांच्या लक्षात आले आहे की, काही अळ्या आणि किडे प्लास्टिकचे कण खाऊन ते विघटीत करू लागले आहेत. बॅसिलस, हॅलोमोनास, आर्थ्रोबॅक्टर, वगैरे कवक गटातील काही सूक्ष्मजीव समुद्राच्या पाण्यात, प्लास्टिकचा भराव टाकलेल्या खड्ड्यांमध्ये, डम्पिंग ग्राउंड मध्ये, उकिरड्यांमध्ये, खारफुटीच्या मातीमध्ये, गटारांमध्ये प्लास्टिकचा कचरा खाताना आढळले आहेत. यंदा ५ जून पर्यावरण दिनाची हाक आहे- प्लास्टिक प्रदूषण टाळा. प्लास्टिक हा आपले जीवन सुकर करणारा दूत आहे, हे नक्कीच. वैद्यकीय सोयी, प्रवासी गाड्या, घरगुती वस्तू यांतील प्लास्टिक हे आपल्यासाठी वरदान आहे. त्यामुळे प्लास्टिकला दूषण नको द्यायला. पण प्रदूषणही नको करायला. प्लास्टिक वारंवार कचऱ्यात जाणे ही खरी समस्या आहे.

**आपण ग्राहक पंचायतीच्या मुशीतले सुजाण नागरिक म्हणून काय काय करू शकतो?**

- एकदा वापरून फेकायच्या प्लास्टिकच्या बाटल्या, डबे, पिशव्या टाळणे. आपल्या संस्थेच्या संघटन विभागाच्या सभेसाठी ग्राहक भवनात येणाऱ्या कार्यकर्त्यांना रंजना मंत्री ताकीद देतात की, आपला स्वत:चा पेला घेऊन या. किंवा ग्राहक भवनात असलेल्या काचेच्या/स्टीलच्या पेल्यातून प्या. प्लास्टिक किंवा मेणकागदाचे ग्लास ग्राहक भवनात नसतात. आपण हे आपल्या घरगुती समारंभातही कटाक्षाने करू शकतो, पाण्याच्या प्लास्टिक- बाटल्यांचा क्रेट आणणे टाळू शकतो.
- घरी पाहुणे येतात तेव्हा वापरा-फेका प्रकारच्या प्लेट्स, बाउल, ग्लास वापरण्यापेक्षा आपापल्या ग्राहक संघातील किंवा शेजारातील मैत्रिणीनी एकमेकींची भांडी तात्पुरती वापरायला घेणे हा पर्याय कसा आहे?
- खरेदीसाठी जाताना नेहमी कापडी आपण सगळे पिशवी सोबत ठेवत असालच, तसे आवाहन आपण अधिकाधिक ग्राहकांना, विक्रेत्यांना करत राहू.
- घाऊक वस्तू खरेदी केल्यास प्लास्टिकचे पॅकेजिंग कमी लागते. आपल्या वितरण यंत्रणेमुळे ते साधते, हा प्रचार आवर्जून करा. शिवाय आपल्या वितरणात वापरल्या जाणाऱ्या गव्हा, तांदळाच्या कापडी पिशव्या, साबण, शाम्पूसाठी कमीत कमी पॅकेजिंगचा प्रयत्न याबद्दल सांगत राहा.
- सौंदर्यप्रसाधनांमध्ये मायक्रोबीड्स असतात. त्यांचा वापर शक्यतो टाळा.
- पॅक केलेले अन्नपदार्थ कमीत कमी खरेदी करा.
- आपल्या घरी निर्माण होणारा प्लास्टिक कचरा सुयोग्य वेचकांना द्या. आपले ऑफिस, मुलांच्या शाळा, महाविद्यालये यांनाही अशा वेचकांशी जोडून द्या.
- आपली स्थानिक स्वराज्य संस्था (महापालिका, जिल्हा परिषद, ग्राम पंचायत) प्लास्टिक कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी योग्य प्रणाली वापरेल यासाठी आग्रही राहा.
- प्रदूषण करणाऱ्या प्लास्टिकवर कर लावणे, प्लास्टिक उत्पादक कंपन्यांवर त्यांच्या उत्पादनांच्या विल्हेवाटीची जबाबदारी असणे अशा गोष्टी धोरणांत यायला हव्या, यासाठी आपण काय करू शकतो, याचा विचार करूया.
- कागदी उत्पादने, मातीची भांडी, बांबूच्या वस्तू अशा नैसर्गिकरित्या विघटित होणाऱ्या नवीन पर्यायांना प्रोत्साहन द्यायला हवे.

छोट्या-छोट्या सवयी बदलून आपण या समस्येवर मात करू शकतो आणि पर्यावरणाचे रक्षण करू शकतो. बघा ना, पृथ्वीचे निसर्गातील सफाई कामगार म्हणजे सूक्ष्मजीव. तेही आता त्यांची नैसर्गिक सवय बदलून प्लास्टिकचे विघटन करण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. आपण तर बुद्धिजीवी मानव आहोत!

**- शुभदा चौकर**

# यंदा मातीची किंवा कायमची मूर्ती घ्याल?

– **डॉ. शुभा राऊळ, माजी महापौर, मुंबई**

**पर्यावरण स्नेही गणपतीसाठी मूलगामी काम केलेल्या मुंबईच्या माजी महापौरांचे आवाहन**



मुंबईच्या महानगरपालिका आयुक्तांनी काही दिवसांपूर्वी मूर्तिकार, सार्वजनिक गणपती मंडळांचे पदाधिकारी यांचे समवेत पर्यावरण पूरक शाडूच्या गणपतीच्या मूर्ती जास्तीत जास्त तयार व्हायला हव्यात व पीओपीच्या मूर्तींना बंदीच घालावी या विषयावर सभा घेतली होती. त्यावेळी तेथे मूर्तीकारांनी त्यास प्रचंड विरोध केला. ही बातमी वाचून खेद वाटला.

पर्यावरणाला हानी न पोहोचवता आपण आपले सण साजरे करण्याची आता नितांत आवश्यकता आहे. तसं पाहिलं तर खूपच उशीर झाला आहे. तरी better late than never. मी महापौर असताना २००७ साली हा विषय मांडला होता. आज १८ वर्षे उलटली तरी अजूनही हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

गोव्यामध्ये समुद्रात किंवा नदीत मूर्ति विसर्जनास कायद्याने बंदी आहे. त्याच धर्तीवर आपल्याकडे सुध्दा कायद्याने बंदी आणण्याची गरज आहे, अशी मी मागणी केली होती. परंतु तशी बंदी आणण्यास वेळ लागेल. म्हणून मी लोकांनाच आवाहन केलं होतं की, पर्यावरणाचे रक्षण करण्याचे आपल्याच हातात आहे. आपण पीओपीच्या मूर्ती घेऊ नयेत. त्यानुसार पार्ले, दादर, वरळी आणि अनेक ठिकाणच्या लोकांनी मला पाठिंबा दिला होता व शाडूच्या मातीच्या मूर्ती घेण्यास सुरुवात केली. तसेच पीओपीवर कायद्याने बंदी नसल्याने किमान त्या मूर्तींचे विसर्जन तरी वेगळे करावे असा एक विचार पुढे आला. त्यासाठी प्रत्येक विभागात कृत्रिम तलाव निर्माण करून त्यामध्ये विसर्जन करण्याची व्यवस्था करावी, यासाठी मी महापौर असताना मुंबई महापालिकेकडून निधी मंजूर करून घेतला होता. त्यासाठी तत्कालीन मुंबई महानगरपालिका आयुक्त जयराज फाटक, उपायुक्त सुधीर नाईक आणि आयआयटी पवईचे पर्यावरण विभागाचे प्रमुख डॉ. असोलेकर यांचे मोलाचे सहकार्य मिळाले होते. त्यावेळी मी मागील पाच वर्षांची, सार्वजनिक गणपती आणि घरगुती गणपतीची आकडेवारी मागितली होती. तेव्हा सार्वजनिक गणपती १५,५०० आणि घरगुती गणपतीची संख्या दोन लाखांवर होती. त्यानंतर, पुन्हा पंधरा वर्षांनी मी माहिती घेतली. तेव्हा यामध्ये प्रचंड वाढ झाल्याचे निदर्शनास आले. सुरुवातीला कृत्रिम तलावात मूर्ति विसर्जित करताना थोडा गोंधळ झाला होता. परंतु, आता नियमितपणे कृत्रिम तलावात विसर्जन करण्याची सोय केली जाते, हेही नसे थोडके.

पूर्वी एका घरात एक गणपती असे. घरातील सर्व सख्खे, चुलत एकत्र येत असत. परंतु, आता प्रत्येक जण आपला वेगळा गणपती आणतो. त्यामुळे मूर्तींची संख्या वाढली आणि प्रदूषणही वाढले. खर्च वाढला. मोठ्या शहरांमध्ये तर गल्लोगल्ली सार्वजनिक गणपती आणले जातात. यावर नियंत्रण आणण्याची मोठी गरज आहे. प्रशासनाने गणेशोत्सव मंडळांना परवानगी देताना खूप कडक निकष लावण्याची आवश्यकता आहे.

तसं पाहिलं तर शाडूच्या मातीच्या गणपती मध्ये सुध्दा चिकटपणा येण्यासाठी फेविकॉल तसेच रंगांचा वापर केला जातो. त्यामुळे नदी, तलाव किंवा समुद्रात विसर्जन केल्यावर त्याचा एक थर तळाशी तयार होतो आणि त्यातील जलचरांच्या वाढीला धोका निर्माण होतो. म्हणून एक पाऊल पुढे जाऊन मी असं म्हणते की, एक कायमस्वरूपी धातूची म्हणजे तांबे, पितळ, चांदी, सोने, पंचधातू किंवा मार्बल, लाकडाची मूर्ती करून घेऊन गणपतीच्या दिवशी प्राणप्रतिष्ठा करावी. आणि विसर्जनाच्या दिवशी विधिवत उत्तरपूजा करून त्याचे घरातच बादलीमध्ये विसर्जन करावे. आणि पुन्हा ती मूर्ती धुऊन पुसून कपाटात ठेवावी. हा सुध्दा एक उत्तम पर्याय ठरतो, नैसर्गिक स्रोतांचे आणि जलजीवनाचे रक्षण करण्यासाठी.

माझं हे अरण्यरुदन ठरू नये म्हणून मी आपल्या मुंबई ग्राहक पंचायतीच्या सूज्ञ सभासदांना आवाहन करते की, आपण आपल्यापासूनच सुरुवात करून ही चळवळ उभी करूया. पीओपीच्या मूर्तींची नोंदणी न करता, घरीच मातीची तयार केलेली मूर्ती किंवा वर सुचविलेल्या पर्यायांपैकी एखादी आपल्याला परवडेल अशी कायमस्वरूपी मूर्ती घेऊन यावर्षीच्या गणपती उत्सवात पर्यावरण रक्षणाच्या कामी एक आदर्श घालून देऊ या. सूज्ञ मंडळी या आवाहनाला प्रतिसाद देतील, अशी आशा वाटते.

# ग्राहक न्यायालयांची फेररचना करा

**सर्वोच्च न्यायालयाचा गंभीर इशारा**

ग्राहक न्यायालयांची रचना आणि कार्यप्रणालीत केंद्र सरकारने काही महत्त्वाचे फेरबदल तातडीने न केल्यास ग्राहक न्यायालयांची सध्याची रचनाच कोसळू शकते, असा गंभीर इशारा देत याबाबत येत्या तीन महिन्यांत केंद्र सरकारची भूमिका प्रतिज्ञापत्रावर सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याचा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च  न्यायालयाच्या न्या. सुंदरेश आणि न्या. अभय ओक यांच्या खंडपीठाने नुकताच दिला आहे.

**पार्श्वभूमी:** महाराष्ट्रातील राज्य ग्राहक आयोगातील सदस्य आणि अनेक जिल्हा आयोगांतील अध्यक्ष आणि सदस्यांच्या राज्य सरकारने मोठ्या प्रमाणावर केलेल्या सर्व नियुक्त्यांना काही वकील उमेदवारांनी आव्हान दिल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या सर्व नियुक्त्या ज्या नियमांनुसार केल्या होत्या. ते नियमच अवैध ठरवून या सर्व नियुक्त्या सुध्दा अवैध घोषित केल्या होत्या. त्यावर राज्य आणि केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपिल करून या निर्णयावर तात्पुरती स्थगिती मिळवली होती. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने सर्व संबंधितांचे युक्तिवाद ऐकून २१ मे २०२५ रोजी महत्त्वाचा निर्णय दिला आहे. २०२३ मधील केल्या गेलेल्या राज्य आयोगातील सदस्य आणि जिल्हा आयोगांतील अध्यक्ष आणि सदस्य यांच्या नेमणुका सर्वोच्च न्यायालयाने अबाधित ठेवल्याने हे सर्व अध्यक्ष आणि सदस्य आता त्यांचा कालावधी पूर्ण होईपर्यंत ग्राहक न्यायालयांतील कामकाज कायदेशीरपणे करू शकतील. जे दोन नियम नागपूर खंडपीठाने अवैध घोषित केले होते त्यापैकी एक नियम सर्वोच्च न्यायालयानेही अवैध म्हणून घोषित केला आहे, तर दुसरा नियम वैध असल्याचा निर्वाळा दिला आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयात दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र सरकारने येत्या चार महिन्यात नवे सुधारीत नियम जारी करावेत, असाही आदेश सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी दिला आहे. नव्या नियमांनुसार राज्य आणि जिल्हा ग्राहक आयोगांतील अध्यक्ष आणि सदस्यांच्या यापुढील होणाऱ्या नेमणुका चार वर्षांऐवजी पाच वर्षांच्या असतील.

ग्राहक न्यायालयातील अध्यक्ष आणि सदस्यांच्या कालावधी-आधारित नियुक्त्यां ऐवजी कायमस्वरूपी नियुक्त्या केल्यास त्या जास्त हितावह असतील, असे सांगत एखाद्या व्यक्तीची कायमस्वरूपी नियुक्ती ऐवजी कालावधी-आधारित नियुक्ती केल्यास त्या व्यक्तीला कामात फारसे स्वारस्य आढळून येत नाही आणि त्यामुळे एकंदरीत न्यायदानाच्या प्रक्रियेवर आणि गुणवत्तेवर याचा परिणाम होऊ शकतो अशी महत्त्वपूर्ण नोंद सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयात केली आहे. इतकेच नाही तर ग्राहक चळवळीचे आणि ग्राहकांच्या तक्रारींचे सोप्या पध्दतीने आणि जलद गतीने निवारण करणाऱ्या यंत्रणेचे महत्त्व सविस्तरपणे पहिल्या २७ पानांत विशद करत ग्राहक संरक्षण कायद्यातील तक्रार निवारण यंत्रणेत कायमस्वरूपी नेमणुकांसह काही आमूलाग्र बदल त्वरेने न केल्यास ग्राहक आयोगांची ही संपूर्ण तक्रार निवारण यंत्रणाच कोसळू शकते असा धोक्याचा

गंभीर इशाराही सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी दिला आहे. मुंबई ग्राहक पंचायतीने सर्वोच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत केले आहे. केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाने यावर चर्चा करण्यासाठी देशातील प्रमुख ग्राहक संस्थांसह सर्व संबंधितांची एक संपूर्ण दिवसाची बैठक बोलवावी, अशी मागणी केली आहे.

## नवीन संघास मान्यता

| संघ | संघ कोड | सभासद |
| --- | --- | --- |
| **मुंबई** | | |
| **सत्यदर्शन - ४ ग्राहक संघ** | 11228AN | ०८ |
| **आय.ओ.एस.आर ग्राहक संघ** | 12575DR | ११ |
| **सखी ग्राहक संघ** | 12535SZ | ११ |
| **केसर मराठी ग्राहक संघ** | 21576KD | १० |
| **दातृत्व ग्राहक संघ** | 12136DR | ०९ |
| **आर्किड ॲस्पायर ग्राहक संघ** | 22241GO | १० |
| **भेटीगाठी ग्राहक संघ** | 42513GV | ०८ |
| **केसर मराठी ग्राहक संघ** | 21576KD | १० |
| **ठाणे** | | |
| **नवरंग ग्राहक संघ** | 15684TN | १२ |
| **पुणे** | | |
| **ब्लू रिज ग्राहक संघ** | 19244PU | २० |

# तक्रारींसाठी आरटीओचा एकच हेल्पलाइन क्रमांक

घरातून रेल्वे स्थानकापर्यंत किंवा रेल्वे स्थानकातून कार्यालयापर्यंत जाताना अनेक नागरिकांना रिक्षा, टॅक्सीचालकांच्या अरेरावीचा अनुभव येतो. गर्दीच्या वेळेत ॲपआधारित टॅक्सीचालकही भाडे नाकारून प्रवाशांच्या नियोजनात खोडा घालतात. अशा मुजोर प्रवासी वाहतूकदारांवर कारवाई करण्यासाठी टोल फ्री क्रमांक १८०० २२० ११० सुरू करण्यात आला आहे.

मुंबई महानगर क्षेत्रात (एमएमआर) रिक्षा, टॅक्सी तसेच ॲपआधारित सेवा देणाऱ्या वाहनांची संख्या वाढती आहे. एमएमआरमध्ये अंधेरी, वडाळा, मुंबई सेंट्रल, बोरिवली, ठाणे, कल्याण, वाशी, वसई, पनवेल, पेण अशी १० प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन कार्यालये (आरटीओ) आहेत. सर्व कार्यालयांचा स्वतंत्र हेल्पलाइन क्रमांक असल्याने प्रवाशांना तक्रार करताना अडचणी निर्माण होत होत्या. तसेच, तक्रारींचा पाठपुरावा करणेही जिकिरीचे काम होते. यामुळे सर्व आरटीओंसाठी एकच हेल्पलाइन क्रमांक असावा, अशी मागणी प्रवाशांनी परिवहन आयुक्तालयाकडे केली होती.

**प्रमुख तक्रारी...**

- भाडे नाकारणे
- अरेरावी / गैरवर्तन
- अधिकचे भाडे आकारणे
- लांबच्या रस्त्याने दुरून स्थळी पोहोचविणे
- वाहनक्षमतेपेक्षा अधिकचे प्रवासी बसविणे
- नादुरुस्त वाहन चालविणे
- सार्वजनिक वाहनात प्रवासी वस्तू विसरल्यास त्या परत न करणे



**टोल फ्री क्रमांक - १८०० २२० ११०**
**केंद्रीकृत कक्ष - अंधेरी आरटीओ, (मुंबई पश्चिम)**
**कार्यक्षेत्र - मुंबई महानगरक्षेत्र (एमएमआर)**

टोल फ्री क्रमांकावरील तक्रार अंधेरी आरटीओतील केंद्रीकृत प्रवासी मदत कक्षात नोंदवण्यात येणार आहे. संबंधित आरटीओतील प्रवासी मदत पथकाला तक्रारीबाबत ई-मेल व फोनद्वारे कळविण्यात येईल. संबंधित कार्यालयाच्या प्रवासी मदत कक्षास तक्रार प्राप्त झाल्यानंतर विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

# गोरेगाव ग्राहक पेठेत संस्थेचा ५० वा वाढदिवसही!

**– स्वप्ना कुलकर्णी**

पु. ल. देशपांडे यांनी त्यांच्या एका लेखात मिश्किलपणे लिहिले होते की बायकांना ज्या काही गोष्टी फक्त स्वत:लाच उत्तम जमतात असे वाटते त्यातली एक गोष्ट म्हणजे खरेदी. दोन पैशांचा अळू असो नाहीतर २,०००/- चा शालू असो, दक्षता तीच आणि हुज्जतही तीच! खरेदी विषयी स्त्रियांच्या चोखंदळ आणि दक्ष स्वभावाला ओळखूनच मुंबई ग्राहक पंचायतीच्या ग्राहक पंचायत पेठेची आखणी केली जाते. पूर्ण कुटुंबाच्या गरजेच्या वस्तू, योग्य किमतीत आणि उत्तम दर्जाच्या मिळण्याचे खात्रीशीर ठिकाण म्हणजे ग्राहक पंचायत पेठ.

पेठांच्या वार्षिक शृंखलेत पहिला नंबर लागतो तो गोरेगाव पेठेचा! १० ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत गोरेगाव पश्चिम येथील जवाहरनगर हॉलमध्ये ही पेठ दिमाखात साजरी झाली. यावेळची खासियत म्हणजे पेठेचा प्रचार फक्त Digital flyers मार्फतच नाही तर YouTube reels मार्फत सुध्दा झाला. ही रील्स मोठ्या मेहेनतीने आणि कल्पकतेने तयार केली होती, निर्भया सावे हिने. तिच्या मदतीला चेतना ग्राहक संघाच्या उत्साही सदस्य होत्या. मार्गदर्शन होते शुभदा चौकर आणि नेहा जोशी यांचे!

उद्‌घाटनाला प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिध्द लेखिका, डॉ. स्मिता दातार यांना निमंत्रित करण्यात आले होते. पहिल्या दिवशी १० एप्रिलला श्रीगजाननाला वंदन करून त्यांनी पेठेचे औपचारिक उद्‌घाटन केले. त्यांनी नुकत्याच सुरू केलेल्या बुक क्लबची नोंद घेत पुस्तक वाचन करत असलेली एक सुंदर गणपतीची मूर्ती देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त पंचायत पेठ समिती अध्यक्ष अनुराधा देशपांडे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या आणि पेठेची वैशिष्ट्ये स्पष्ट केली.

उपस्थितांशी संवाद साधताना स्मितातांईनी लहानपणापासून संस्थेच्या वाटपाशी त्या जोडलेल्या, आहेत असे सांगितले. कारण त्यांची आई MGP ची सदस्य! त्यांनी कार्यकर्त्यांचे कौतुक करत संस्थेबद्दल गौरवोद्गार काढले. सुवर्णमहोत्सव वर्षपूर्तीनिमित्त १२ एप्रिल रोजी हॉलमधील श्रीगणेशमूर्ती समोर सुंदर मोठी रांगोळी काढण्यात आली होती. कार्यकर्त्यांबरोबरच सर्व स्टॉलधारकांनी मिळून ५१ ज्योती त्या रांगोळीच्या सभोवती उजळल्या. आपण त्या दिव्यांच्या तेजाकडून प्रेरणा घेत आपले काम ५० पटीने वाढवूया, असे आवाहन शुभदाताईंनी केले. साळवी सर म्हणाले, आपण लोकल वरून ग्लोबल झालो. कित्येक लोक आपले अनुकरण करायचा प्रयत्न करत आहेत, परंतु आपल्या सारखा सेवाभाव मात्र कुठेच आढळून येत नाही.

यावर्षी संस्थेच्या शिक्षण विभागाचा 'जागो ग्राहक' स्टॉल 'पुनर्वापर' या संकल्पनेवर आधारित साकारण्यात आला. सेल्फी कॉर्नरच्या सजावटीत यावेळी मोठ्या खोक्यांना रंगीत कागद लावून त्यावर ग्राहक जागृतीचे विविध संदेश लिहीले होते. या मनोऱ्यासाठी वापरलेले खोके वितरणातील तेलासाठी येतात, ते होते. त्यावरील संदेशांत माहीत असणाऱ्या म्हणीचे अर्थ ग्राहक प्रबोधनाशी जोडून स्लोगन केल्या होत्या. उदा. पी हळद हो गोरी; जाहिराती सांगतात फसवी स्टोरी, वाजत नाही एका हाताने टाळी; ओटीपी बाबत हवी अळीमिळीगुपचिळी इत्यादी.

स्टॉल अधिक माहितीपूर्ण व आकर्षक करण्यासाठी वेगवेगळ्या विषयावरील पोस्टर्स चित्रस्वरूपात करून घेतली होती. उदा. सॉफ्ट ड्रिंक्सचे कॅन उघडून लगेच पूर्ण गट्टम करता का? ओढण्या / दुप्पटे वापरून कॅनोपी स्वरूपात हा स्टॉल सजवला होता. विविध प्रश्नमंजूषा घेण्यात आल्या. सन्मित्र शाळेतील मुलांनी त्यांच्या मुख्याध्यापिका मोरे बाई यांसोबत स्टॉलला भेट दिली आणि सर्व प्रश्नमंजुषा उत्साहाने सोडवल्या.

सुवर्ण महोत्सवी वर्षपूर्तीच्या निमित्ताने वितरणाचा स्टॉल आपल्या काही आठवणींना उजाळा देण्यासाठी मोठ्या कल्पकतेने सजविला होता. आपली पहिली वितरीत वस्तू म्हणून श्रीफळ, तसेच आपण वाटपात देत असलेल्या वस्तू विविध डाळी, तांदूळ, मसाले काचेच्या बाटलीत भरून स्टॉल सजवण्यात आला होता. पूर्वी संघासंघातून तांदूळ-गव्हाच्या गोणी, गुळाची ढेप सभासदांमध्ये एकत्रित जात असत. त्यामुळे या वस्तू वाटून

देण्यासाठी तराजू संघात असे. त्याचे स्मरण म्हणून तराजू टांगला होता. एका सुपामध्ये छोट्या छोट्या गोण्या करून डाळी, कडधान्ये, खडे मसाले भरून स्टॉल ५० वर्ष पूर्ती निमित्ताने सजवला होता. ही सजावट नेहा जोशी यांनी केली होती.

सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने सर्व स्टॉलधारकांनी मिळून जणू **'कृतज्ञता मनोगत'** पेठेच्या प्रवेशद्वाराशी लावले होते आणि सर्व स्टॉल आकर्षकरित्या सजवले होते. मुंबई ग्राहक पंचायतीचा स्टॉल मिळणे त्यांना अभिमानास्पद वाटते, असा खास उल्लेख त्यात होता. उत्तम सजावट करणाऱ्या स्टॉलधारकांचे कौतुक बक्षिस देऊन करण्यात आले. सुशोभन स्पर्धेचे परीक्षण सविता दोंदे आणि जान्हवी नाडकर्णी यांनी केले. सर्व स्टॉल सुंदर, समर्पक सजवले होते. **स्टॉल सजावट स्पर्धेत प्रथम क्रमांक - एंथ्यू फॉर आर्ट, द्वितीय क्रमांक - सिमरन कलेक्शन आणि तृतीय क्रमांक – पोशिंदा** यांना मिळाला. पेठ अध्यक्षा अनुराधा देशपांडे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. विभागीय कार्यकारिणी, पेठ समिती सदस्य, तसेच असंख्य स्वयंसेवी आणि उत्साही कार्यकर्त्यांच्या एकजूटीने आपल्या पंचायत पेठेची उलाढाल एक कोटीच्यावर गेली. या व्यवहाराच्या दैनंदिन नोंदीचे काम साळवी सर, भोसले सर, काणे सर आणि निखिल चौकर यांनी, तर विभागीय/पेठ हिशोब निवेदिता महाजन यांनी सांभाळले. गोरेगावातील संपूर्ण पेठ उत्साहाने, कल्पकतेने साजरी झाली.



**गोरेगाव पेठेतील उत्साही कार्यकर्ते**



**'बँकिंग' बद्दल बोलूया**

# वारस नोंदणी आणि मृत्युपत्र

**- अभय दातार**

मध्यंतरी एक महिला तक्रारदार गिरगावातील आपल्या तक्रार मार्गदर्शन केंद्रात तक्रार घेऊन आल्या होत्या. एका बँकेत त्यांच्या वृध्द आईचे बचत खाते आणि लॉकर होता. आई बाहेर पडू शकत नसल्याने त्याच सर्व व्यवहार सांभाळायच्या. आईच्या मृत्यूनंतर त्या बँकेत गेल्या तेव्हा बचत खाते आणि लॉकरसाठी कोणीही वारसदार नेमला नाहीये असे त्यांच्या लक्षात आले आणि त्यांना धक्का बसला. त्यांच्या आईने मृत्युपत्रही तयार केले नव्हते. इतकी वर्षे ही महिला आईचे सगळे व्यवहार सांभाळत होती, पण या गोष्टी तपासून पहाव्यात असे तिच्यासारख्या सुशिक्षित महिलेला वाटले नाही! त्यामुळे बचत खात्यातील शिल्लक आणि लॉकरमधील वस्तू मिळाव्यात म्हणून त्यांनी जेव्हा अर्ज केला, तेव्हा साहजिकच बँकेने त्यांना त्याच कायदेशीर वारस आहेत हे सिध्द करणारे प्रमाणपत्र कोर्टाकडून आणायला सांगितले. ही एक वेळखाऊ आणि खर्चिक प्रक्रिया समजली जाते.

या महिलेच्या आईने बचत खाते आणि लॉकरसाठी निदान वारस (नॉमिनी) जरी नेमला असता, तरी प्रक्रिया बरीच सुटसुटीत झाली असती. आईच्या मृत्यूचे प्रमाणपत्र, सदर महिलेचे आधार आणि पॅनकार्ड असे काही कागदपत्र मागवून बँकेने बचत खात्यातील पैसे आणि लॉकरमधल्या वस्तू द्यायची व्यवस्था केली असती. जर शिल्लक रक्कम जास्ती असेल, तसेच लॉकरमध्ये काही मूल्यवान वस्तू असतील, तर बँक आणखी काही विशिष्ट कागदपत्रे, जसे की Indemnity Bond मागू शकते.

सहज म्हणून चौकशी केली तेव्हा समजले की, आपल्या आईची इतर कोठे गुंतवणूक आहे का, विमा पॉलिसी आहे का, याबद्दल त्या महिलेला काहीच माहिती नव्हते! विमा असो व कोणत्याही प्रकारची गुंतवणूक, प्रत्येक ठिकाणी आपला वारसदार नेमायची सोय आहे. शिवाय अलीकडेच बँकांमध्येही एकपेक्षा अधिक वारसदार नेमायची सुविधा उपलब्ध झाली आहे. प्रत्येक वारसदारापुढे त्याचा किती टक्के वाटा आहे ते लिहावे लागते आणि या टक्क्यांची एकूण बेरीज १०० असायला हवी. वारसापत्र असो अथवा मृत्युपत्र, त्यात जे नाव देणार ते पाळण्यातले अधिकृत नाव असावे. आपली मानसिकता

अशी आहे की अधिकृत नाव राजेंद्र किंवा मीनाक्षी, आपण हाक मारताना राजू किंवा मीनू अशी हाक मारतो आणि हीच नावे लिहिली जातात. परंतु त्यामुळे या वारसांची मोठी अडचण होते. राजू आणि राजेंद्र एकच आहेत, मीनू आणि मीनाक्षी एकच आहेत हे सिध्द करण्यासाठी स्टँप पेपरवर तसे प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. त्यामुळे प्रत्येकाने याबाबतीत योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे.

मृत्युपत्र कसे लिहावे याबाबत काही ठोस असे सांगता येणार नाही, कारण जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती. दुसरी अडचण अशी की गुंतवणुकीचा तपशील बदलत राहतो. नवीन मुदत ठेव ठेवणे, आधीची रिन्यू करणे, म्युच्युअल फंड व शेअर्समधली गुंतवणूक यात बदल होत राहतात आणि प्रत्येक वेळा मृत्युपत्र अद्ययावत करावे लागते. परंतु आधुनिक तंत्रज्ञानामुळे एक मोठी सोय झाली आहे, ती म्हणजे आपल्याला गुंतवणूकदार, खातेदार, म्हणून मिळणारा एक विशिष्ट क्रमांक. आपली प्रत्येक बचत किंवा गुंतवणूक या क्रमांकाशी जोडली जाते. उदाहरणार्थ एखाद्या बँकेत असलेले माझे बचत खाते, मुदत ठेवी एका विशिष्ट क्रमांकाशी जोडल्या जातात. मी ज्या म्युच्युअल फंडात नेहमी गुंतवणूक करतो, ती एका खात्याशी जोडली जाते. मी वेगवेगळ्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये व्यवहार करतो, हे व्यवहार ब्रोकरने दिलेल्या क्रमांकाशी जोडले जातात.

या सुविधेमुळे मी मृत्युपत्र तयार करताना प्रत्येक गुंतवणुकीचा तपशील देण्याऐवजी फक्त त्या बँकेचा, त्या म्युच्युअल फंडाचा, त्या ब्रोकिंग कंपनीचा 'तो' क्रमांक दिला की पुरेसे होते. समजा मला माझ्या मृत्यूपश्चात बँकेतील गुंतवणूक पत्नीला, म्युच्युअल फंडातील गुंतवणूक मुलीला आणि शेअर्समधली गुंतवणूक मुलाला द्यायची असेल, तर मी असे लिहू शकतो की, "माझ्या मृत्यूपश्चात अमुक अमुक बँकेच्या अमुक अमुक शाखेत असलेली xxxx या क्रमांकाशी जोडली गेलेली गुंतवणूक माझ्या पत्नीस द्यावी." तर ते पुरेसे होईल. संपूर्ण तपशील द्यायची गरज पडणार नाही. तीच गोष्ट इतर गुंतवणुकीसाठी लागू आहे.

हे सगळे तुम्हाला काहीसे क्लिष्ट वाटत आहे का? मग काळजी करू नका. आमच्या तक्रार मार्गदर्शन केंद्रात या, आम्ही तुम्हाला सर्व काही व्यवस्थित समजावून सांगू.

**(विशेष नोंद : वारसाची नोंद आणि मृत्युपत्र याबाबत या लेखात दिलेली माहिती फक्त आर्थिक क्षेत्रापुरती आहे.)**

**वाचकहो, तुम्ही तुमचे ऑनलाईन व्यवहार सुरक्षित ठेवले आहे का?**



- 'ग्राहक तितुका मेळवावा' च्या मार्च, २०२५ च्या अंकात यासंबंधी आलेला लेख तुम्ही वाचला का?
- आपले ऑनलाईन बँकिंग व्यवहार अमुक वेळेत होऊ नयेत यासाठी तुम्ही इंटरनेट बँकिंगमध्ये असलेल्या सुविधेचा वापर केला का?
- लाभार्थीला दिली जाणारी रक्कम, एका दिवसात एकंदरीत दिली जाणारी एकूण रक्कम, एका दिवसात किती व्यवहार व्हावेत ती संख्या, या सर्वांवर तुम्ही आवश्यक ती मर्यादा घातली आहे ना?

राजस्थान येथील उपभोक्ता संरक्षण समितीचे अध्यक्ष संजय शर्मा यांनी शुक्रवार २ मे रोजी ग्राहक भवनात येऊन कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे आणि शर्मिला रानडे यांची भेट घेतली. ग्राहक चळवळी संदर्भात चर्चा केली. संजय शर्मा हे राजस्थानमधे 'चेतना कम्युनिटी रेडिओ' चालवत असून त्याद्वारे ग्राहक जागृतीचे कार्य करतात. त्यांनी शिरीष देशपांडे आणि शर्मिला रानडे यांची रेडिओसाठी एक मुलाखतही घेतली.



# श्रद्धांजली



मुंबई ग्राहक पंचायतीच्या एक सक्रीय कार्यकर्त्या **आसावरी (श्यामा) नाचणे** यांचे १२ मे रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अचानक निधन झाले. कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे आणि संस्थेचे विश्वस्त संजीव मंत्री यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन अंत्यदर्शन घेऊन नाचणे कुटुंबियांचे सांत्वन केले. त्यांच्या पश्चात त्यांचे पति अविनाश नाचणे, मुलगा शौनक आणि सून आदिती आहेत.

आसावरी (श्यामा) नाचणे अंधेरी-जोगेश्वरी विभागाची पूर्वीची कार्याध्यक्ष आणि विद्यमान कार्यवाह. सदैव हसतमुख, उत्साही. काही वर्षांपूर्वीची एक आठवण- अंधेरीला ग्राहक पंचायत पेठ सुरू होती. वितरणाच्या स्टॉलवरील मोदक पीठ पहिल्याच दिवशी संपले. आता काय, हा प्रश्न समोर आला. आपण स्थानिक पातळीवर मोदक पीठ करूया का लगेच? असे विचारताच श्यामा म्हणाली, “मी करते प्रयत्न. माझ्या चक्कीवाल्याकडून दळून घेते.” मग आम्ही लगेचच अपना बाजारमधून एक किलो इंद्रायणी तांदूळ खरेदी केला. उल्का पाटील हिने तिच्या घरच्या घरघंटीवर दळून, त्या पिठाचे गरमागरम लुसलुशीत मोदक करून घेऊन संध्याकाळी पेठेत हजर झाली. आणि मग दुसऱ्या दिवशी सकाळी ६० किलो तांदूळ श्यामाच्या चक्कीवाल्याकडे दळणासाठी रवाना झाले. दुपारी १ पर्यंत पीठ दळून गोडाऊन मध्ये पॅकिंगला आले. संध्याकाळी ५ वाजता पेठेत ग्राहकांना पीठ उपलब्ध झाले. अशी तिची धडाडी होती!

अशा किती आठवणी सांगाव्यात! अशा आमच्या ह्या सखीला विनम्र आदरांजली.

– **अनुराधा देशपांडे**



सांताक्रूझ विभागाचे पहिले कार्याध्यक्ष **प्रभाकर चेंबूरकर** २४ एप्रिलला निधन झाले. त्यांच्या कार्यकाळात चेंबूर विभाग जोमाने कार्यरत होता. चेंबूरकर आणि शशिकांत साळवी मिळून अनेक कार्यक्रम आयोजित करत. दर महिन्याला दुसऱ्या शनिवारी एक नवीन विषय व नवीन वक्ता बोलावून भाषणांचे आयोजन, दरवर्षी सहलींचे आयोजन, संघभेटी, दिवाळी फराळ वाटप, आंबा वाटप असे अनेक! आपल्याच वाटपातील गहू एकत्रित दळून प्रमाणित घटीनुसार पाच किलोच्या पिशव्यातून पीठ देण्याची सुरूवात याच विभागात झाली. विद्यार्थ्यांसाठी ॲप्टीट्यूड टेस्ट आणि (पब्लिक स्पिकिंग) वक्तृत्व कला वर्ग असे विविध उपक्रम साकारण्यात आले. या सर्व कामांत चेंबूरकर पती-पत्नीचे सहकार्य मोलाचे होते. चेंबूरकर यांना, मुंबई ग्राहक पंचायतीचा उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते.



अंधेरी-जोगेश्वरी विभागातील ज्येष्ठ कार्यकर्त्या **सुलभा श्रीकृष्ण देशपांडे** यांचे ३० एप्रिल रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. बकुळ संघाच्या त्या संघप्रमुख होत्या. १९८५ सालापासून त्या विभागात कार्यकर्त्या होत्या. विभागीय वाटपासाठी त्यांचे घर कायम उघडे असायचे. २०१४ साली ग्रीन ॲक्शन फंडच्या अंतर्गत मुंबई ग्राहक पंचायतीने पर्यावरणस्नेही गणेशोत्सव स्पर्धा घेतली होती, त्या स्पर्धेत त्यांनी पारितोषिक मिळवले होते. पथनाट्यातील त्यांचे काम वाखाणण्याजोगे असायचे. कायम हसतमुख आणि अत्यंत मनमिळाऊ असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.



गोरेगाव विभागाचे माजी कार्योपाध्यक्ष **मा. सुधाकर गव्हाणकर** यांचे रविवार, ११ मे रोजी निधन झाले. गव्हाणकर काका आणि वहिनी त्यांचे घर विभागीय वितरणासाठी देत असत. त्याचप्रमाणे विभागीय कामकाजात सर्वतोपरी मदत आणि सहकार्य वेळोवेळी करीत असत. गोरेगाव विभागातील सर्व कामांत त्यांचा पुढाकार असे. त्यांचे वय ८६ होते. त्यांना विनम्र श्रध्दांजली.

वाचू आनंदे




## आपले वर्तन आपला मेंदू

**लेखक:** डॉ. आनंद जोशी, सुबोध जावडेकर
**राजहंस प्रकाशन**
**मूल्य:** ₹४४०/- **वाटपातील किंमत:** ₹३२०/-

'मेंदू हा शरीराचा अधिपती, सर्वेसर्वा'. अशा या मेंदूचे आणि माणसाच्या वर्तनाचे नाते कसे, हे स्पष्ट करताना लेखक म्हणतात, 'आपले वर्तन आपल्या मेंदूला काहीतरी देते आणि आपला मेंदू ही आपल्या वर्तनाला काहीतरी देतो. असा हा टेबल-टेनिसचा खेळ आहे, निरंतर चालणारा'.

माणसाच्या मेंदूचा अभ्यास अतिशय जटील आणि आव्हानात्मक असला तरी लेखक द्वयीने मेंदूच्या बहुरंगी कामसूपणाची ओळख रोचक पध्दतीने करून दिली आहे. मानवी वर्तन आणि मेंदूतील विविध साद-प्रतिसाद यांचे सामान्यांसाठी काहीसे अनोखे विश्व या पुस्तकातून सहज रसाळ शैलीत उलगडत जाते.

मेंदूतील इलेक्ट्रिकल activity हे वर्तनाचे इंजिन आहे. खोटे खोटे हसणे, फसवणे, नाकबूल करणे यासारखे वर्तन ही माणसाची खासियत हळू हळू उत्क्रांत होत गेली. 'आपला आजचा मेंदू हा लाखो वर्षांच्या उत्क्रांतीचा परिपाक आहे'. अशी माहिती इथे साधार मिळते. वैद्यकीय संशोधनाचे तपशील देत, मेंदूच्या अनेकांगी क्षमता विविध प्रकरणातून स्पष्ट केल्या आहेत. 'छोटा मेंदू छोटा नसतो', 'अश्रू आनंदाचे अश्रू दुःखाचे', 'मादक द्रव्यांच्या व्यसनाचे प्रवेशद्वार', 'चुंबनाचे मेंदू विज्ञान', 'मेंदूकडे जाणारी वाट पोटातून जाते', 'शारीरिक व्यायाम आणि स्मृतीक्षमता' अशी एकूण ३४ प्रकरणे आहेत.

आपल्या जगण्याशी प्रतिक्षण जोडलेला मेंदू आणि आपले वर्तन यांच्या संदेश-संवादाचे आकलन व्हावे आणि आवश्यक तिथे आपल्या वागण्यात बदल कसा शक्य करता येतो, याचे दिशा-दर्शन मिळावे, यासाठी हे पुस्तक नक्की मदत करेल.

– **वसुंधरा देवधर**

## बोरिवली - फायर ब्रिगेडला भेट



शनिवार १५ मार्च रोजी जागतिक ग्राहक हक्क दिनाचे औचित्य साधून मुंबई ग्राहक पंचायतीच्या बोरिवली विभागातील १५ कार्यकर्त्यांनी बोरिवली फायर ब्रिगेडला भेट देऊन अग्नि सुरक्षा केंद्राधिकारी शशिकांत फाळके (लीडिंग फायर मन), सोनाली जाधव (महिला अग्निशामक), शरद पाटील, उदय ढवळे यांची भेट घेतली. त्यांनी माहिती देताना आग लागण्याची मुख्य कारणे सांगितली. उष्णता, इंधन, प्राणवायू या मुख्य तीन गोष्टींपासून आगी लागतात लाकूड, कपडा, पेपर, केरोसीन, पेट्रोल सीएनजी विजेच्या उपकरणांपासूनही आगी लागू शकतात. तेथील अधिकाऱ्यांनी आग कशी विझवावी याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. घरात आगी लागू नये म्हणून घरातून बाहेर पडताना घरातील नळ, गॅस, विजेचे मुख्य स्वीच बंद करावेत अशी उपयुक्त माहिती देऊन त्यांनी मार्गदर्शन केले. बोरिवली विभागातर्फे अग्निशमन अधिकारी व त्यांचे सहकारी यांना कापडी पिशवी आणि अल्पोपहार देऊन त्यांचे आभार मानले.

# वार्षिक मेळावे उत्साहात संपन्न

## अंधेरी-जोगेश्वरी विभाग

अंधेरी-जोगेश्वरी विभागाचा ३८ वा वार्षिक मेळावा रविवार, १६ मार्चला दिमाखात सादर करण्यात आला. मेळाव्याच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या, ज्येष्ठ अभिनेत्री रजनी वेलणकर, तर अध्यक्ष म्हणून संस्थेच्या कार्योपाध्यक्षा अनुराधा देशपांडे उपस्थित होत्या. संस्थेच्या विश्वस्त अनुराधा गोरे, संस्थेचे विश्वस्त आणि अंधेरी-जोगेश्वरी विभागाचे अध्यक्ष संजीव मंत्री सुध्दा आपुलकीने मेळाव्यासाठी उपस्थित होते.

अपर्णा दळवी हिने सुरेल ईशस्तवन म्हणून कार्यकमाला सुरुवात केली. अंधेरी-जोगेश्वरी विभागाच्या कार्याध्यक्षा मंगला गाडगीळ यांनी प्रास्ताविक केले. विद्या विकास शाळेत घेण्यात आलेल्या 'Good Ad- Bad Ad' स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या रजनी वेलणकर यांनी 'अ-अभिनयाचा, अ-अध्यापनचा' या विषयावर आपले अनुभव ओघवत्या शैलीत उत्कृष्टपणे मांडले. लहानपणीच प्रायोगिक नाटकात काम केले त्यामुळे आयुष्यात अभिनय लवकर शिरला. १९७९ साली त्यांचा अ-अध्यापनाचा पाठ पार्ले टिळक विद्यालय या शाळेत सुरू झाला. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी अभिनय कसा उपयोगी पडेल याचा विचार करून त्यानुसार इतिहास किंवा मराठी, इंग्रजी मधील धडे शिकवितांना स्वतः त्यांचे नाटकात रूपांतर केले. मुलांकडून नाटके बसवून घेतली. या नाटकांना अनेक पारितोषिके मिळाली. याशिवाय तो धडा मुलांना चांगल्या रीतीने समजला. राजा-राणीच्या गोष्टींतून आपण बाहेर पडायला हवे, या विचाराने त्यांनी 'एक होता कार्व्हर' या पुस्तकावर आधारित मुलांचे नाटक बसवले. छोट्या-छोट्या गोष्टींतून मुलांवर संस्कार केलेल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. विराम-चिन्ह, चढउतार, ताल यांचे महत्त्व सांगत त्यांनी आगगाडी आणि रूळ ही कविता म्हणून दाखवली.

दुसऱ्या सत्रात 'अज्ञात शलाका' हे नाटक सादर झाले. आपल्या वैभवशाली मातृभूमीने मुघल, अरब, पठाण, पोर्तुगीज आणि ब्रिटीश अशा अनेक परकीय आक्रमणाचा फटका सहन केला. आक्रमण परतवण्यासाठी तत्कालीन राजे, रयत यांच्या बरोबरीने काही महिला क्रांतिकारी लढवय्या झाल्या. त्यांना वीरगती मिळाली. यातील बऱ्याच महिलांचा इतिहासात साधा उल्लेखही नाही. अशा १४७ स्त्रिया अनुराधा गोरे यांनी शोधून काढल्या. त्यातील ९ जणींच्या कहाण्यांवर आधारित स्वगते लिहिली. हीच स्वगते संध्या ओक यांच्या 'रंगवेध'तर्फे नाट्यस्वरूपात सादर करण्यात आली. शीतल तळपदे यांच्या प्रकाश योजनेमुळे कार्यक्रम अतिशय लखलखीत आणि उठावदार झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून अनुराधा देशपांडे यांनी विभागाचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे विश्वस्त आणि अंधेरी-जोगेश्वरी विभागाचे अध्यक्ष संजीव मंत्री यांनी विभागाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, तसेच कार्यक्रमांच्या सादरीकरणासाठी सक्रिय मदत देईन, असे सांगितले. अंधेरी-जोगेश्वरी विभागाच्या कार्यवाह आसावरी नाचणे यांनी सर्व पाहुणे, सर्व उपस्थित विभागीय कार्याध्यक्ष, कार्यवाह, प्रतिनिधी तसेच विभागातील सभासदांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीना पाटील यांनी केले.

**– ज्योती मोडक, कार्यवाह**




**व्यासपीठावर - अनुराधा देशपांडे, संजीव मंत्री, रजनी वेलणकर, अनुराधा गोरे आणि मंगला गाडगीळ**

## ❯ चेंबूर विभाग

चेंबूर विभागातील सभासदांचा वार्षिक मेळावा रविवार, ९ मार्च रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. 'ग्राहक तितुका मेळवावा' या आपल्या संस्थेच्या मुखपत्राच्या संपादिका शुभदा चौकर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. जान्हवी नाडकर्णी यांनी सभागृहाच्या प्रवेशद्वारात काढलेल्या रांगोळीने सर्व सभासदांचे आणि मान्यवरांचे स्वागत झाले.

स्वाती करंजे यांनी गायलेल्या गणेश वंदनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. “आजकालच्या तंत्रज्ञानाच्या जगात भेटीगाठी दुर्मिळ झाल्या आहेत, सभासदांची गाठभेट होईल, या उद्देशाने हा मेळावा आयोजित केला आहे”, असे सहकार्यवाह मृणाल बेडेकर यांनी प्रास्ताविकात सांगितले. कार्याध्यक्ष अलका दडपे यांनी चेंबूर विभागाच्या कार्यकारिणीतील कार्यकर्त्यांची ओळख करून दिली.

विभागाचे कार्यवाह अनिल ठोसर यांनी गेल्या वर्षात विभागात झालेल्या उपक्रमांची माहिती सर्वांना दिली. यात मुख्यत्वे जनरल एज्युकेशन अकॅडमी शाळेत दर महिन्याला जी व्याख्याने आयोजित केली होती, त्यांचा उल्लेख होता. चेंबूर येथील ग्राहक पंचायत पेठेचे दुसरे वर्ष व त्यातील कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग, त्यानिमित्ताने आयोजित केलेले विविध उपक्रम, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना दिलेल्या निवेदनासोबत सह्यांची मोहीम, विभाग स्तरावर करण्यात येणारी नैमित्तिक वाटपं इत्यादी बद्दलची माहिती अनिल ठोसर यांनी दिली.

मेडीक्लेम पॉलिसी किती प्रकारच्या असतात, पॉलिसी घेताना ग्राहकाने कोणकोणत्या गोष्टीचा नीट विचार करावा, याची सविस्तर माहिती प्रमुख पाहुणे CA गौरव कोठारी यांनी दिली. कोणत्या आजारांसाठी किंवा उपचारांसाठी कधीच मेडीक्लेम पॉलिसीमधून परतावा मिळत नाही, हे ही स्पष्ट केले. जमेल तितक्या कमी वयात सर्वांनी आपली मेडीक्लेम पॉलिसी काढावी आणि ती काढायच्या वेळी किंवा दुसऱ्या कंपनीकडे पोर्ट




**व्यासपीठावर- डावीकडून अलका दडपे, शुभदा चौकर, CA गौरव कोठारी आणि अनिल ठोसर**

करायच्या वेळी कोणतेही आजार असल्यास लपवून ठेवू नये, हेही त्यांनी सांगितले. आपला क्लेम कंपनीकडून नाकारण्यात आला तर काय करावे, अशी सर्व सविस्तर माहिती त्यांनी PPT द्वारे दिली.

त्यानंतर सुवर्णा कुलकर्णी यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षा शुभदा चौकर यांची ओळख करून दिली. शुभदा चौकर यांनी आपल्या ओघवत्या शैलीतील भाषणात चेंबूर विभागाच्या स्थापनेमागची रंजक गोष्ट सांगितली. चेंबूर विभाग हा मुंबई ग्राहक पंचायत संस्थेचा सर्वात पहिला विभाग आहे आणि या विभागातील ज्येष्ठ कार्यकर्ते कमळाकर पेंडसे सर हे आपल्या संस्थेच्या विभागवार रचनेचे जनक आहेत, असेही त्यांनी सांगितले. नवीन संघ स्थापन करायला जाताना आपल्या संस्थेची फक्त दर महिन्याला वितरणाद्वारे रास्त दरात आणि उत्कृष्ठ दर्जाच्या वस्तू, धान्य देणारी संस्था अशी संकुचित ओळख करून न देता संस्था स्थापनेमागील व्यापक विचार व संस्थेचे बहुआयामी कार्य कार्यकर्त्यांनी नवीन लोकांना सांगावे, असे त्या म्हणाल्या. आता या विभागाची नवी टीम जोमाने काम करते आहे, याबद्दल त्यांनी सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तन्वी घैसास यांनी केले. सुप्रिया मुळगावकर यांनी सर्वांचे आभार मानले. यानंतर उपस्थित

सर्वांना पोटभर अल्पोपहार देण्यात आला. मेळाव्याच्या दुसऱ्या भागात मधुरा शास्त्री व सहकारी यांचा सुगम संगीताचा बहारदार कार्यक्रम झाला. विशेष म्हणजे चेंबूर मधील पहिला ग्राहक संघ ज्यांच्या पुढाकाराने सुरू झाला त्या मेहेंदळे बाई या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. अंजली अभ्यंकर, रीटा परळकर, जान्हवी नाडकर्णी, मोहन सहस्रबुध्दे, राहुल लामगुंडे, गीतांजली यत्नाळकर, जयंत केळकर, सदानंद जोशी, प्रसाद महात्मे, आशीर्वाद बेडेकर हेही कार्यकर्ते आयोजनात सहभागी होते.

**– अनिल ठोसर, कार्यवाह, चेंबूर विभाग**

## बोरिवली विभाग

२९ मार्च रोजी बोरिवली विभागाचा वार्षिक मेळावा साजरा झाला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मुंबई ग्राहक पंचायतीच्या ज्येष्ठ कार्यकारिणी सदस्य आणि आपल्या 'ग्राहक तितुका मेळवावा' या मासिकाच्या आणि 'वयम' मासिकाच्या संपादिका शुभदा चौकर या होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते संस्थेचे कार्योपाध्यक्ष प्रभाकर गवाणे सर. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे ज्येष्ठ पदाधिकारी कै. भालचंद्र नाईक यांना श्रध्दांजली वाहिली गेली. बोरिवली विभागाचे कार्याध्यक्ष राजेंद्र राणे यांनी नारळाच्या काथ्यापासून तयार केलेल्या कुंडीतील रोपटे देऊन सर्व मान्यवरांचा सत्कार केला.

बोरिवली विभागाच्या कार्यवाह सविता वराडे यांनी आपल्या संस्थेला पन्नास वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्त विभागात विविध कार्यक्रम प्रत्येक महिन्यात सादर केले गेले, त्याची माहिती सांगितली. त्यानंतर प्रमुख पाहुण्या संपादिका शुभदा चौकर यांनी त्यांचे विचार मांडले. त्यांनी बोरिवली विभागाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांचे अभिनंदन आणि कौतुक केले. शिवाय प्रत्येकाने संघ वाढीसाठी आणि सभासद वाढीसाठी प्रयत्न करण्याचेही आवाहन केले. संस्थेच्या त्रिसूत्रीची आठवण ठेऊन ते विचार आचरणात आणावेत, असेही आवाहन केले.




**रविश्चंद्र लवाटे यांना शुभदा चौकर यांच्या हस्ते उत्कृष्ठ कार्यकर्ता पुरस्कार. व्यासपीठावर राजेंद्र राणे व प्रभाकर गवाणे**

यानंतर गवाणे सरांनी बोलताना सांगितले की, वितरण व्यवस्था माणसाला जोडून ठेवते. उपभोगावर संयम आणि चंगळवाद टाळणे याबद्दल तरुण पिढीला मार्गदर्शन केले पाहिजे. शोषणमुक्त समाज पाहिजे असेल तर आपली वितरण व्यवस्था टिकली पाहिजे. गवाणे सरांनीसुध्दा बोरिवलीच्या पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे कौतुक केले. त्यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या शुभदा चौकर यांच्या हस्ते बोरिवली विभागाचे यावर्षीचे उत्कृष्ट कार्यकर्ते रविश्चंद्र लवाटे यांचा सत्कार केला गेला. मनिषा पुराणिक यांनी आभार प्रदर्शन केले. यानंतर मनोरंजनात्मक कार्यक्रम म्हणून 'सूर्याची पिल्ले' या सदाबहार नाटकाचा प्रयोग झाला. प्रयोग छान रंगला. बोरिवलीच्या वार्षिक स्नेहमेळाव्याला ७३० सभासद उपस्थित होते.

**– अपर्णा पित्रे**

## › सांताक्रूझ विभाग

मुंबई ग्राहक पंचायतीच्या सांताक्रूझ विभागाचा ३३ वा वार्षिक मेळावा २३ मार्च रोजी साने गुरुजी आरोग्य मंदिर या शाळेच्या सभागृहात संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्योती मोडक (कार्यवाह) या होत्या. तसेच मेळाव्याच्या प्रमुख पाहुण्या प्रा. मंजिरी घरत या होत्या.

सनईच्या वादनाने सर्व वातावरण प्रसन्न झाले होते. सर्वप्रथम विवेक ठवाळ यांनी सर्व मान्यवर मंडळीचे स्वागत केले. विभागाच्या कार्याध्यक्ष विद्या पेडणेकर यांनी प्रास्ताविक केले. तसेच कार्यवाह वृषाली ठवाळ यांनी सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त वर्षभरात विभागात अनेक वेगवेगळे उपक्रम, कार्यक्रम केले गेले, त्यांचा कार्यात्मक अहवाल सादर केला.

मेळाव्याच्या प्रमुख पाहुण्या मंजिरी घरत यांनी 'औषध साक्षरता' या विषयावर उपस्थित ग्राहक-बंधू भगिनींना मार्गदर्शन केले. त्यांनी अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले –

- १९४५ पासून असा कायदा आहे की प्रत्येक केमिस्टच्या दुकानात फार्मासिस्ट असलाच पाहिजे.
- औषधे विकत घेताना ती अतिशय काळजीपूर्वक घ्यावीत. त्यावरील माहिती वाचावी. विशेषतः Expiry Date अतिशय महत्त्वाची आहे.
- औषधाचे बिल घेणे तेही तितकेच महत्त्वाचे आहे.
- घरी आल्यावर औषधांची साठवणूक व्यवस्थित ठिकाणी केली पाहिजे. औषधांसाठी एक वेगळा बॉक्स असावा.
- औषधांचे वेळापत्रक तयार करून ठेवावे व नियमितपणे पाळावे. औषधांचा कालावधी पाळणे सुध्दा महत्त्वाचे आहे.
- लिक्विड औषध बाटलीबरोबर दिलेल्या Measuring cup नेच घेतले पाहिजे. घरातील टीस्पूनने घेता कामा नये.
- कोणतीही गोळी सांगितल्याशिवाय अर्धी तोडून घ्यायची नसते. असे केल्याने त्या गोळीचे वरील आवरण नष्ट होते व तो डोस ब्रेक होतो.
- काही आजारांसाठी डॉक्टर antibiotic औषध आपल्याला देतात, त्याचा एक ठराविक कालावधीचा कोर्स असतो. तो पूर्ण करावा. मध्येच सोडू नये.
- आपल्याकडे बरीच unused किंवा expiry झालेली औषधे शिल्लक असतात. ती आपण बरेचदा कचऱ्यात फेकून देतो. त्यामुळे पर्यावरणाची हानी होते. आपल्याकडे अजून तरी औषधे disposal करण्यासाठी कोणतीही योजना नाही. परदेशात मात्र औषधांच्या दुकानातच अशी औषधे टाकण्यासाठी बॉक्स ठेवले जातात. यासाठी शासनाला पत्र लिहून ठिकठिकाणी ही औषधे जमा करण्यासाठी असे बॉक्स ठेवण्यास सांगू या. मी आपल्याला या कामासाठी मदत करेन.

विभागाचे अध्यक्ष डॉ. वसंत शेणॉय यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आपल्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाचा घटक म्हणजे साखर या विषयावर मार्गदर्शन केले.

मेळाव्याच्या अध्यक्षा ज्योती मोडक यांनी उपस्थित सभासदांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या, "पुनर्विकासामुळे नवीन सोसायटी तयार झाली असेल तर तेथे जाऊन पुन्हा आधीचे सभासद व नवीन सभासद मिळून पुन्हा नव्याने संघ स्थापन करावा. आपले सभासद वाढवणे ही आपली जबाबदारी आहे. स्मिता डोईफोडे यांनी आभारप्रदर्शन केले. यानंतर आव्हान पालक संघ या संस्थेतील मुलांचा 'आव्हानचा रंगीबिरंगी नृत्याविष्कार' हा कार्यक्रम सादर झाला. या संस्थेच्या संचालिका वंदना कर्वे यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. आरती आजगांवकर यांनी त्यांचा परिचय करत दिला. या नृत्याच्या कार्यक्रमामध्ये मुले, पालक, संचालिका सहभागी होत्या. सर्व नृत्ये तनुजा




**सांताक्रूझ विभागातील मेळाव्यात प्रमुख पाहुण्या ज्योती मोडक यांच्या समवेत उत्साही सहभागी कार्यकर्ते**

भडसावळे यांनी बसवली होती. दोन्ही सत्रांतील कार्यक्रमाचा आनंद सभासदांनी मनमुराद घेतला. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यासाठी १३० सभासद उपस्थित होते.

**– वृषाली ठवाळ, सांताक्रूझ विभाग, कार्यवाह**

## दहिसर विभाग

दहिसर विभागाचा ३५ वा वार्षिक मेळावा रविवार १३ एप्रिल रोजी दहिसर विद्यामंदिर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास मुंबई ग्राहक पंचायतीच्या कायदेतज्ज्ञ शर्मिला रानडे या प्रमुख वक्त्या आणि विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व गणेश प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर कु. ओजस्वी चुडनाईक हिने आपल्या गोड आवाजात ईशस्तवन सादर करून वातावरण भारावून टाकले.

कार्यवाह रूपाली कदम यांनी पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन मान्यवरांचे स्वागत केले. पुष्पगुच्छ 'स्नेहज्योत' या दिव्यांग संस्थेमार्फत बनवण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष पुरुषोत्तम होडावडेकर यांनी त्यांच्या नेहमीच्या खुमासदार शैलीत केले. त्यानंतर कार्यवाह रूपाली कदम यांनी दहिसर विभागाच्या वर्षभराच्या कामकाजाचा अहवाल सादर केला.

सुवर्ण महोत्सवी वर्षात विभागाने ग्राहकोपयोगी १२ विविध उपक्रम राबवले, याचा त्यांनी विशेष उल्लेख केला. या उपक्रमांमध्ये विभागाच्या अध्यक्षा सीमा सोनटक्के यांचे मार्गदर्शन लाभले, हेही त्यांनी नमूद केले. शर्मिला रानडे यांनी त्यांच्या भाषणात सोशल मीडिया विषयी सखोल माहिती दिली. त्यांनी सोशल मीडियाचा उपयोग करताना घ्यावयाची काळजी, धोके आणि संभाव्य गुन्हे यावर सविस्तर चर्चा केली.

- **ॲडिक्शन :** सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे नात्यांपासून तुटलेपणा.
- **चुकीची माहिती :** अफवा, खोट्या बातम्यांचा प्रसार.
- **मानसिक आरोग्य समस्या :** न्यूनगंड, नैराश्य, चिंता.
- **सायबरबुलिंग :** ऑनलाईन छळ व आत्मविश्वास कमी होणे.
- **गोपनीयतेचा भंग :** डेटा चोरी, वैयक्तिक माहितीचा गैरवापर.
- **बाल शोषण व सेक्स्टोर्शन :** बनावट खात्यांच्या माध्यमातून लहान मुलांना लक्ष्य करणे.

त्यांनी सांगितले की १९३० या क्रमांकावर सायबर गुन्ह्यांची तक्रार करता येते. याबाबत नागरिकांनी घाबरून न जाता त्वरित पोलिस स्थानकाशी संपर्क साधावा. त्यांच्या भाषणानंतर श्रोतांच्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. सीमा सोनटक्के यांनी ग्राहक चळवळीत विशेषतः युवकांचा सहभाग वाढवण्याची गरज नमूद केली. तसेच, विभागातील कार्यकारिणी सदस्य हे सर्व उपक्रमांमध्ये एकजुटीने सहभागी होत असल्याबद्दल गौरवोद्गार काढले. यानंतर चंद्रशेखर ठाकूर आणि तृप्ती सरदेसाई यांनी 'मराठी नाटकातील सौंदर्यस्थळे' या विषयावर एक मनोरंजक कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाचा समारोप तृप्ती सरदेसाई यांच्या सुमधूर नाट्यगीताने झाला. सूत्रसंचालन विजय खानोलकर यांनी तर आभार प्रदर्शन रजनी राऊत यांनी केले.

**– नितीन पालकर**




**व्यासपीठावर- कार्याध्यक्ष पुरूषोत्तम होडावडेकर, कार्यवाह रुपाली कदम, कायदे तज्ज्ञ शर्मिला रानडे, अध्यक्ष सीमा सोनटक्के**

# ठाणे विभाग संघप्रमुख स्नेहमेळावा

– श्वेता लोटलीकर

मुंबई ग्राहक पंचायत या संस्थेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आणि ठाणे वितरण केंद्राचा ३२ वा वर्धापन दिन यांचे औचित्य साधून दिनांक २३ मार्च २०२५ रोजी ठाणे केंद्रांतर्गत संघ प्रमुख आणि कार्यकर्त्यांचा स्नेहमेळावा, गोखले मंगल कार्यालय, नौपाडा, ठाणे येथे संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सन्माननीय प्राचार्य अशोक चिटणीस आणि ठाणे लोकसभा मतदार संघाचे खासदार नरेश म्हस्के हे उपस्थित होते. या सोहळ्यास संस्थेचे कार्याध्यक्ष, ॲड. शिरीष देशपांडे, कार्योपाध्यक्षा अनुराधा देशपांडे, ठाणे विभाग अध्यक्षा मिनल टिपणीस, कार्योपाध्यक्ष प्रभाकर गवाणे हे ही व्यासपीठावर उपस्थित होते.

सोहळ्याची सुरुवात दीप प्रज्वलन करून आणि वीणा परांजपे यांच्या मंजुळ आवाजातील प्रार्थनेने व ईशस्तवन करून झाली. मुंबई ग्राहक पंचायतीचे संस्थापक सदस्य, आदरणीय स्व. बिंदुमाधव जोशी, स्व. मधुकरराव मंत्री आणि स्व. सुधीर फडके यांच्या बहुमूल्य कार्याचे स्मरण करून प्रभाकर गवाणे यांनी मुंबई ग्राहक पंचायत आणि ठाणे विभाग यांच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला. सगळ्या आव्हानांना समर्थपणे तोंड देत अटकेपार झेंडा रोवणारी मुंबई ग्राहक पंचायत आणि २३ मार्च १९९३ रोजी स्थापन झालेला ठाणे ग्राहक महासंघ आणि २००६ साली स्थापन झालेले ठाणे वितरण केंद्र यांच्या कार्याबद्दल प्रभाकर गवाणे यांनी विस्तृतपणे सांगितले. ग्राहक पंचायत संस्थेसमोर आताच्या काळात असलेली आव्हाने आणि त्यावर उचलावयाची पावले या बद्दलही त्यांनी मार्गदर्शन केले.

राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित मा. प्राचार्य अशोक चिटणीस यांनी विद्यार्थ्यांनी आयुष्यभर शिकण्याची वृत्ती ठेवावी, सातत्याने ज्ञान ग्रहण करत राहावे आणि काळानुसार आवश्यक ते बदल स्वीकारून स्वतःचा विकास करत राहावा, असा मौल्यवान सल्ला दिला. त्यांच्या कार्यबहुल कारकीर्दीचा आढावा अत्यंत प्रेरणादायी ठरला.

आदरणीय खासदार नरेश म्हस्के यांनी मुंबई ग्राहक पंचायतीच्या लोकोपयोगी कार्याचे कौतुक केले आणि त्यांच्या उपक्रमांसाठी आवश्यक ती सर्व मदत करण्याची ग्वाही दिली. आदरणीय ॲड. शिरीष देशपांडे सर यांनी मुंबई ग्राहक पंचायतीमार्फत सभासद व ग्राहकांच्या हक्कांबाबत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती सभासदांना दिली. त्यांनी 'न्यू इंडिया बँक' ठेवीदारांच्या समस्येकडे लक्ष वेधून, त्यांच्या संपूर्ण ठेवी १००% विमा संरक्षित करण्याची मागणी संसदेत मांडावी, अशी विनंती खासदार नरेश म्हस्के यांना केली.

या सोहळ्यासाठी ज्येष्ठ नेते आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष, डॉ. विनय सहस्रबुध्दे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार होते. मात्र काही अपरिहार्य कारणांमुळे ते प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत. तरीही त्यांनी व्हिडिओ संदेशाच्या माध्यमातून सर्वांशी संवाद साधला. या संवादादरम्यान त्यांनी मुंबई ग्राहक पंचायतीच्या ग्राहक चळवळीतल्या महत्त्वपूर्ण योगदानाचे विशेष कौतुक केले.
या सोहळ्याच्या वेळी, नवी मुंबईतील 'हॅप्पी होम' या ९४ सभासदांसह कार्यरत असलेल्या संघाला 'सर्वोत्कृष्ट संघ' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या संघाचे श्री. वसंत साळी आणि महादेव देवळे यांनी संघामार्फत हा पुरस्कार स्वीकारला. त्यांनी आपल्या मनोगतात संघाने आजपर्यंत राबवलेल्या विविध उपक्रमांची आणि वार्षिक आर्थिक उलाढालीची माहिती दिली. त्यांच्या संघाची वाटचाल ही इतर सर्व संघांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

या प्रसंगी, वर्षोनुवर्षे मुंबई ग्राहक पंचायतीच्या कार्यात सक्रीय सहभाग घेणाऱ्या तसेच आपल्या संघाचा विस्तार होण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेल्या अनेक ज्येष्ठ संघप्रमुखांचा आणि सभासदांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित सन्मानित सभासदांनी आपली मनोगते व्यक्त करताना इतर संघांना मार्गदर्शनही केले.

ठाणे विभागाचे कार्याध्यक्ष प्रभाकर गवाणे, कौस्तुभ सुळे आणि सुनील कुंटे यांनी उपस्थित सर्व संघप्रमुख व सभासदांशी सुसंवाद साधत त्यांच्या अडचणी, अनुभव आणि अपेक्षा जाणून घेतल्या तसेच आवश्यक त्या मुद्द्यांवर मार्गदर्शनही केले. या सोहळ्यादरम्यान वितरण व्यवस्थेची जबाबदारी चोख पार पाडणाऱ्या ठाणे वितरण केंद्रातील कामगार / कर्मचाऱ्यांना सुध्दा सन्मानित करून त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. चाफ्याच्या फुलांनी आणि आकर्षक पिशवीने केलेलं मनःपूर्वक स्वागत, 'स्वरसंवाद' तर्फे सादर करण्यात आलेली बाबूजींच्या गीतांची सुरेल मैफिल, तसेच श्रीखंड – पुरीच्या पारंपरिक मराठमोळ्या जेवणाचा खास थाट – या सर्वांनी या सोहळ्याचा आनंद द्विगुणीत झाला.

## सिटी कोऑप बँक ठेवीदारांचा लढा

**– अनिता खानोलकर, कार्यवाह**

बुडीतखात्यात गेलेल्या सिटी कोऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदार संस्थेने शनिवार ३ मे रोजी केशव गोरे सभागृह, गोरेगाव येथे एक जाहीर सभा आयोजित केली होती. या सभेत अ‍ॅड. शिरीष देशपांडे यांनी ठेवीदारांना मार्गदर्शन करून ठेवीदारांची लढायची तयारी असल्यास त्यांनी संस्थेचे सदस्य व्हावे आणि मग मुंबई ग्राहक पंचायत त्यांच्या वतीने राष्ट्रीय ग्राहक आयोगात कायदेशीर लढा देईल, असे जाहीर केले. त्याला उपस्थित ठेवीदारांनी होकारात्मक प्रतिसाद दिला. त्या दिवशी १२७ ठेवीदारांनी दोन वर्षांसाठी मुंबई ग्राहक पंचायतीचे सदस्यत्व स्विकारले. या सभेला अनुराधा देशपांडे, अर्चना सबनीस, शर्मिला रानडे, वसुंधरा देवधर, शुभदा चौकर, नेहा जोशी, पूर्णिमा राव, अनघा आचरेकर, निवेदिता महाजन, प्रतिभा साळवी इ. अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या ठेवीदारांतर्फे आता आपण राष्ट्रीय आयोगात तक्रार दाखल करुन त्यांच्या पाच लाखांहून अधिक असलेल्या रकमा परत मिळवून देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

ठेवीदारांना उद्देशून केलेल्या भाषणात अ‍ॅड. देशपांडे यांनी ठेव विमा आणि पत हमी महामंडळ कायद्यानुसार (DICGC Act) ठेवीदारांच्या पाच लाखांपर्यंतच्याच ठेवी विमा सुरक्षित असल्याचे सांगून हे सरकारी विमा महामंडळ सर्व बँकांकडून प्रिमियम मात्र संपूर्ण ठेवींवर दर सहा महिन्यांनी वसूल करत असल्याचे सांगितले. इतकेच नाही तर पाच लाखांची ही रक्कम ठेवीदारांना वितरीत केल्यानंतर ही सर्व वितरीत रक्कम हे ठेव विमा महामंडळ दिवाळखोरीत गेलेल्या बँकेच्या उरल्यासुरल्या ठेवी आणि मालमत्तेतून अग्रहक्काने कलम २१च्या आधारे वसूल करते. कायद्याच्या या विचित्र आणि अन्याय्य तरतुदींमुळे अशा बँकातील पाच लाखांहून उर्वरित ठेवी या ठेवीदारांना परत मिळण्याची शक्यता आणखीनच दुरावते आणि त्यामुळेच सिटी को. ऑपरेटिव्ह बँकेच्या अशा ठेवीदारांनी संघटित होऊन बँकेच्या संचालक मंडळाकडून या पाच लाखांहून अधिक असलेल्या रकमा वसूल करण्यासाठी कायदेशीर लढा देण्याची गरज असल्याचे मत अ‍ॅड. देशपांडे यांनी व्यक्त केले.




**सिटी को. ऑपरेटिव्ह बँकेच्या ज्या ठेवीदारांना या लढ्यात सहभागी व्हायचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी सिटी को. ऑपरेटिव्ह ठेवीदार फाऊंडेशनचे अध्यक्ष सुभाष सबनीस (9819536020), कार्यवाह अभय पानसे (9322740476) आणि खजिनदार शरद बुवा (7977479219) यांच्याशी संपर्क साधावा.**

# Notice to Uber for 'Tip'

**The Central Consumer Protection Authority CCPA has issued a notice to Uber India regarding its 'advance tip' feature, labeling it as an unfair trade practice. Complaints from users about pressure to pre-tip prompted the investigation, with officials warning of potential penalties if Uber's response is inadequate.**

"Forcing or nudging users to pay a tip in advance for faster service is unethical and exploitative. Such actions fall under unfair trade practices. Tip is given as a token of appreciation, not as a matter of right, after the service," Consumer Affairs Minister Pralhad Joshi said He had directed CCPA to examine the issue.

Uber's 'advance tip' prompt appears during the booking process and encourages users to pre-select a gratuity amount before the ride begins a feature found in other ride-hailing apps as well.
CCPA's notice to Uber marks a fresh round of scrutiny on app-based service providers and their compliance with the Consumer Protection Act, 2019, which bars misleading advertisements and unfair pricing strategies.

Several users have complained that Uber's "advance tip" feature creates pressure and confusion, with some alleging that pre-tipping influences driver allocation or pickup speed- claims that, if substantiated, could amount to discriminatory service delivery. Consumer groups have slammed the feature as deceptive. "This distorts the voluntary nature of tipping and can amount to coercive monetization. Platforms must clearly differentiate between service charges and optional tips," said Ashim Sanyal, CEO of Consumer Voice, a consumer protection group. "Such unethical trade practices violate the Consumer Protection Act and warrant strict legal action," added Manish K. Shubhay, partner at The Precept-Law Offices. "Companies must uphold transparency and fairness in all consumer dealings, and any attempt to exploit customers under the guise of service is indefensible."

This isn't the first time Uber has come under the scanner. As reported by Mint on 1 April, the government had earlier confirmed in Parliament that Uber and rival Ola were being investigated for charging different fares based on a user's phone operating system. On 10 January, CCPA issued notices to both companies after complaints surfaced about iOS users being charged higher fares than Android users for identical rides. Both Ola and Uber denied the allegations of charging different fares based on a user's phone model.



# Stop Corrupt Involvement of Registrars in Re-development Process

– **Adv. Shirish V. Deshpande, Chairman**

Mumbai Grahak Panchayat (MGP) has strongly demanded an immediate end to the widespread corrupt involvement of Registrar's offices in the selection of Developers in re-development process of Housing Societies. The Government of Maharashtra has invited suggestions and objections from all stakeholders regarding proposed amendments to the Rules governing cooperative housing societies under MCS Act. In addition to suggesting certain amendments to the proposed rules, MGP has also submitted several important new recommendations concerning re-development including issue of rampant corruption at Registrar's office in the process of selection of Developers. **Some of the key suggestions made by the MGP are as follows:**

**1. Include 79(A) Re-development Guidelines into the Rules:** The comprehensive guidelines on redevelopment issued on July 4, 2019, under Section 79(A) of the Maharashtra Cooperative Societies Act, 1961, be formally incorporated into the Rules. The MGP has stated that doing so will help resolve the longstanding controversy regarding whether these Guidelines are mandatory or merely advisory in nature.

**2. Remove mandatory requirement of the Registrar's presence in Developer Selection process:** Currently, a representative from the Registrar's office is required to be present during the Special General Body meeting convened for selecting a developer for Society's re-development with a view to ensure that the process is transparent and free of any malpractice or coercion. However, MGP has highlighted widespread misuse of this provision by Registrar's office. MGP has claimed that it is no more a secret that Registrar's office demands heavy bribes ranging from ₹25,000 to ₹40,000 per flat in exchange for granting approval for the Spl General Body meeting and the subsequent No Objection Certificate (NOC). Developers, treating this as part of their business cost, allegedly pay these amounts without protest to agents of the registrar. To curb this rampant corruption, the MGP has suggested that the requirement to seek prior permission from the registrar for such meetings be completely abolished, thereby removing the registrar's involvement from the process. This, according to MGP, will make the re-development process faster and cleaner.

To ensure transparency in the developer selection process, the MGP has proposed to retain the requirement for video recording of the proceedings. However, the housing society should keep this video recording with itself and need not submit it to the Registrar. If any complaints or disputes arise, the video film can be produced as evidence in any court.

**3. Relax requirement of minimum 51% votes for Developer selection:** Currently, a developer must

receive at least 51% of the total members' votes to be selected for redevelopment. However, in situations where three developers are shortlisted in the final round, at times, none of them may receive the required 51% majority, creating a deadlock which requires the entire process to be undertaken afresh. This leads to significant delays, especially for old, dilapidated buildings that cannot afford such prolonged timelines. To address this, MGP has suggested that if no developer receives 51% votes in the first round, the top two candidates should face a second round of voting during the same special general meeting. If neither of the two secures 51% votes even in the second round, the society should be allowed to appoint the developer with the highest number of votes.

**4. Provision to hold Committee & General Body meetings hybrid/ online:** During redevelopment, when buildings are demolished, members are dispersed across different locations, making it difficult to conduct committee or general body meetings in person. To solve this issue, MGP has recommended that societies undergoing redevelopment, where the buildings have been demolished, be allowed to conduct their committee meetings, annual general and special general body meetings hybrid/online during the transition period, and such provision be included in the Rules.



# 5 Delhi Restaurants Ordered To Refund Unlawful Service Charges Collected from Customers



The central consumer protection authority (CCPA) has initiated suo moto action against five Delhi-based restaurants for failing to refund mandatory service charges despite a clear ruling from the Delhi High Court.

The CCPA action follows a series of complaints registered through the national consumer helpline (NCH), alleging that the restaurants continued to levy mandatory service charges without seeking consumer consent. In response, the CCPA has issued notices under the Consumer Protection Act, 2019, directing these restaurants to refund the service charge amounts collected in violation of the law.

**Guidelines issued by the CCPA on 4 July 2022 clearly state that:**

- ✔ Service charges must not be automatically added to the food bill.
- ✔ No collection of service charges is allowed by disguising it under different terminology.
- ✔ Consumers must be informed that any service charge is purely voluntary and optional.
- ✔ Access to services must not be conditional on payment of a service charge.
- ✔ Service charges cannot be included in the food bill for the purposes of calculating goods and services tax (GST).

The Delhi High Court, in its judgement on 28 March 2025, upheld these CCPA guidelines, reinforcing consumer rights against unfair trade practices.




श्री गणरायाला वंदन करून गोरेगाव पेठेचे उद्घाटन करताना प्रमुख पाहुण्या डॉ. स्मिता दातार



गोरेगाव पेठेतील शिक्षण+सेल्फी पॉईंटवर सन्मित्र शाळेच्या मुख्याध्यापिका मोरे बाई आणि विद्यार्थी



अंधेरी येथील मेळाव्यात 'अज्ञात शलाका' या नाटकातील कलाकारांचे कौतुक करतांना संस्थेच्या उपाध्यक्ष, विश्वस्त अनुराधा गोरे



सांताक्रुझ मेळाव्यात आव्हान पालक संघ या संस्थेच्या मुलांनी नृत्य सादर केले. संचालिका वंदना कर्वे, सर्व मुले, त्यांचे पालक, या संस्थेमध्ये काम करणाऱ्या समाजसेविका तसेच या संस्थेशी जोडलेल्या मालाड विभागाच्या तृप्ती करंदीकर




सुवर्ण महोत्सव वर्षपूर्ती निमित्त गोरेगाव पेठेत केलेली रांगोळी आणि ५१ दिव्यांची सजावट



ठाणे विभागाच्या स्नेहमेळाव्यात खासदार नरेश म्हस्के यांचे व्यासपीठावर स्वागत करताना संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे




गोरेगाव पेठेतील सुशोभन स्पर्धेतील विजेता स्टॉल: एन्थू फॉर आर्ट

• POSTAL REGISTRATION NO. MCN/158/2023-2025 • WPP LICENSE NO. MR/TECH/WPP-137/NORTH/2023-2025
• LICENSE TO POST WITHOUT PREPAYMENT, ON 5TH & 6TH • VILE PARLE (W) P.O. MUMBAI - 400 056
RNI NO. MAHBIL/2011/39044

Protect the Earth with 3R

# REUSE, REDUCE, RECYCLE

World Environment Day | 5th June

MUMBAI GRAHAK PANCHAYAT

## REUSE

- Reuse items that are still usable before throwing them away.
- Use cloth shopping bags and refillable drinking bottles to reduce waste.

## REDUCE

- Reduce the use of single use products such as plastic straw, bags.
- Choose products that have little packaging or are made from environmentally friendly materials.

## RECYCLE

- Separate waste by type and recycle materials such as paper, plastic, and metal.
- Support recycling programs in your neighbourhood and get others involved.



**Let us wipe out plastic before it wipes our environment.**